RNI No. MAHBIL /2009/29236

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ७, अंक ९] गुरुवार ते बुधवार, मार्च ४-१०, २०२१/ फाल्गुन १३-१९, शके १९४२ [पृष्ठे ०८, किंमत : रुपये १६.००

## प्राधिकृत प्रकाशन

### शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

### MAHARASHTRA STATE LEGAL SERVICES AUTHORITY

### Order

*Read* :— High Court Letter No. A. 1219/2000/254/2021, dated 12th February 2021.

No. MSLSA/2021/379.—The Honourable Chief Justice and Patron-in-Chief and Honourable Executive Chairman, Maharashtra State Legal Services Authority, Mumbai have been pleased to appoint Shri. Hitendra Anilkumar Wani, Metropolitan Magistrate, 50th Court, Vikhroli, Mumbai as the Secretary on the establishment of District Legal Services Authority, Mumbai, in place of Shri. Yatin B. Game.

Mumbai,
dated the 12th February 2021.

ABHAY J. MANTRI,
Member Secretary.

## जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी यांजकडून

**लॉकडाऊनच्या कालावधीत वाढ करणेबाबत**

**आदेश**

क्रमांक ससाशा/कार्या-१३/लॉकडाऊन वाढ/२०२१.—ज्याअर्थी, शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथ रोग प्रतिबंधक कायदा, १८९७, दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करून खंड २,३,४ मधील तरतुदींनुसार अधिसूचना निर्गमीत केलेली आहे.

ज्याअर्थी, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रत्नागिरी जिल्ह्यामध्ये नियंत्रणात ठेवण्याच्या हेतूने व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व प्रसार रोखणे आणि त्यासाठी ठोस उपाययोजना हाती घेणे आवश्यक झाले आहे.

ज्याअर्थी, आता शासनाने संदर्भ क्र. ११ अन्वये लॉकडाऊनचा कालावधी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२१ पर्यंत वाढविला आहे. त्याअर्थी, सदर आदेशाच्या अनुपालनार्थ रत्नागिरी जिल्ह्यात आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

सबब मी, लक्ष्मीनारायण मिश्रा, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रत्नागिरी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व महाराष्ट्र कोव्हीड-१९, उपाययोजना नियम, २०२० ची अंमलबजावणी करणेसाठी ठोस उपायोजना करणेचे दृष्टीने आणि उपरोक्त संदर्भ क्र. ११ मधील शासन आदेशानुसार रत्नागिरी जिल्ह्यात लॉकडाऊनचा कालावधी या आदेशान्वये दिनांक २८ फेब्रुवारी, २०२१ पर्यंत वाढवीत आहे.

सदरचा आदेश संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्याच्या क्षेत्रासाठी लागू राहील.

सदरचा आदेश आज दिनांक १ फेब्रुवारी, २०२१ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित केला आहे.

**लक्ष्मीनारायण मिश्रा,**
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रत्नागिरी.

---

## सहायक निबंधक, सहकारी संस्था, संगमेश्वर, (देवरूख), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांजकडून

**मध्यंतरीय आदेश**

क्रमांक सनिसं/वि-१/मध्यं.आदेश/क-१०२/श्रीस्वासग्राबिशेसपत/सन २०२१.—महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारित) कायदा, २०१३ चे कलम १०२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, संभाजी नलावडे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, संगमेश्वर (देवरूख) तालुका संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी असा मध्यंतरीय आदेश देत आहे की, श्री स्वामी समर्थ ग्रामिण बिगरशेती सह. पतसंस्था मर्यादित, माखजन, मु. पो. मुचरी, तालुका संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी या संस्थेचा कारभार बंद करण्यात येऊन उक्त संस्था अवसायनात घेत आहे. आणि याच कायद्यातील कलम १०३ प्रमाणे सदर संस्थेवर या कार्यालयातील श्री. एम. डी. जाधव उपलेखापरिक्षक, देवरुख यांची अवसायक म्हणून नियुक्ती करीत आहे.

उक्त संस्थेने ज्या मालमत्तेवर, वस्तुंवर व दावा योग्य हक्कांवर उक्त संस्थेचा अधिकार असेल किंवा आहे असे आढळून येईल ती मालमत्ता, वस्तू कागदपत्रे तसेच संस्थेच्या व्यवहारातील पुस्तके, कागदपत्रे, दस्तऐवज यांचा ताबा व नियंत्रण व इतर व्यवस्था, अधिकार वरील नियुक्त अवसायक यांच्या तात्काळ स्वाधीन करावयाचा आहे.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक ११ फेब्रुवारी २०२१ रोजी दिला.

**संभाजी नलावडे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, संगमेश्वर (देवरूख),
तालुका संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी.

## जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांजकडून

### आदेश

क्रमांक वि-१/दिसुवर्णानापत/रामनाथ शेलार/क.१५६/२०२१.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, सतिश खरे, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नाशिक या आदेशान्वये दि सुवर्णा नागरी सहकारी पतसंस्था म. नाशिक, ता., जि. नाशिक या संस्थेचे खालील अधिकाऱ्यांना व त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्जवसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम, १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२१ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे .—

| अ.क्र. | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | रामनाथ लाला शेलार | वरिष्ठ अधिकारी | वसुली अधिकारी | नाशिक जिल्हा |

**अटी .—**

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्जवसुलीची कार्यवाही करावी. कर्जवसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी दरमहा सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अ-३, अ-४, व ब कर्जवसुलीची माहिती संबंधित जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी. ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विभाग, दोन विभाग अथवा राज्य कार्यक्षेत्र आहे त्या संस्थांनी देखील त्यांचे मुख्य कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उप निबंधक यांचे कार्यालयास माहिती सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) विशेष वसुली अधिकारी यांनी वसूल केलेल्या संपूर्ण सरचार्ज रकमेचा भरणा वसूल केलेल्या महिन्यातच चलनाने शासकीय कोषागारात करावा. वसुली अधिकारी यांनी वसूल केलेला सरचार्ज, त्याचा शासकीय कोषागारात केलेला भरणा याबाबत संस्था स्तरावर स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी. त्याबाबतचा नमुना अ-१, अ-२, अ-३, अ-४ सोबत जोडलेला आहे.

(६) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. १९४२/२०१३ दि बेसिन कॅथोलिक को-ऑप. बँक विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेला आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

(७) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाही.

(८) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण. १५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये विशेष वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

(९) वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हील कोर्ट", "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी (महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

(१०) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "वसुली अधिकारी, .............सहकारी बँक/पतसंस्था" असा फलक लावता येऊ शकेल.

(११) वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१२) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व सरचार्ज रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

(१३) सोबतच्या यादीप्रमाणे सर्व प्रकरणामध्ये जंगम जप्ती, स्थावर जप्ती, अपसेट प्राईज मंजुरी, जाहिर लिलाव व कलम १००/८५ अन्वयेची कार्यवाही ही नियमानुसार विहित मुदतीत पूर्ण करण्यात यावी. विहित मुदतीत उक्त कार्यवाही पूर्ण न केल्यास आपणांस दिनांक १ एप्रिल २०२१ पासून पुढील कालावधीसाठी कलम १५६ चे अधिकार प्रदान करण्यात येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी व त्याची सर्वस्वी जबाबदारी ही आपली राहिल.

नाशिक,
दिनांक २७ जानेवारी २०२१.

**सतिश खरे,**
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, नाशिक.

## जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांजकडून

### आदेश

क्रमांक वि-१/गंगागिरीमहाराजपत/स्वाती नेहे/क.१५६/२०२१.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, सतिश खरे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक या आदेशान्वये गंगागिरी महाराज (बेट सराला) नागरी सहकारी पतसंस्था म. नाशिक, या संस्थेचे खालील अधिकाऱ्यांना त्यांचे नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम, १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून व तिची विक्री करून रकमा वसुल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२१ या कालावधीकरीचा प्रदान करीत आहे :—

| अ.क्र. | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र जिल्हा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | सौ. स्वाती दिपक नेहे | वसुली अधिकारी | वसुली अधिकारी | नाशिक जिल्हा |

**अटी :—**

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्जवसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी दरमहा सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात अ-३, अ-४, व ब कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी. ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विभाग, दोन विभाग अथवा राज्य कार्यक्षेत्र आहे त्या संस्थांनी देखील त्यांचे मुख्य कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालयास माहिती सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसूली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सदर व्यक्ती सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सदर व्यक्तीला सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) विशेष वसुली अधिकारी यांनी वसुल केलेल्या संपूर्ण सरचार्ज रकमेचा भरणा वसूल केलेल्या महिन्यातच चलनाने शासकीय कोषागारात करावा. वसुली अधिकारी यांनी वसूल केलेला सरचार्ज, त्याचा शासकीय कोषागारात केलेला भरणा याबाबत संस्था स्तरावर स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी. त्याबाबतचा नमुना अ-१, अ-२, अ-३, अ-४ सोबत जोडलेला आहे.

(६) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. १९४२/२०१३ दि बेसिन कॅथोलिक को-ऑप. बँक विरूद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेला आदेश विचारात घेवून वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

(७) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाही.

(८) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण. १५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये विशेष वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

(९) वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हील कोर्ट", "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी (महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

(१०) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "वसुली अधिकारी, .............सहकारी बँक/पतसंस्था" असा फलक लावता येऊ शकेल.

(११) वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देवून परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधीत कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१२) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व सरचार्ज रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसुल करता येणार नाही.

(१३) सोबतच्या यादी प्रमाणे सर्व प्रकरणामध्ये जंगम जप्ती, स्थावर जप्ती, अपसेट प्राईज मंजुरी, जाहिर लिलाव व कलम १००/८५ अन्वयेची कार्यवाही हि नियमानुसार विहीत मुदतीत पुर्ण करण्यांत यावी. विहीत मुदतीत उक्त कार्यवाही पुर्ण न केल्यास आपणांस दिनांक १ एप्रिल २०२१ पासुन पुढील कालावधीसाठी कलम १५६ चे अधिकार प्रदान करण्यांत येणार नाही यांची गांभीर्याने नोंद घ्यावी व त्याची सर्वस्वी जबाबदारी हि आपली राहिल.

नाशिक,
दिनांक ९ फेब्रुवारी २०२१.

**सतिश खरे,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक.

## THE HIGH COURT AT BOMBAY

APPELLATE SIDE

No. A-3902/2021/342.—The High Court has been pleased to repatriate and post Shri Yatin B. Game, Secretary, District Legal Services Authority, Mumbai as Judge, Small Causes Court, Mumbai for one year.

Bombay,
dated 15th February 2021.

S. G. DIGE,
Registrar General.

---

## THE HIGH COURT AT BOMBAY

APPELLATE SIDE

No. A-3918/2021/292.—In exercise of the powers conferred by Section 260 (*i*) (*c*) of the Code of Criminal Procedure, 1973 (No. 2 of 1974) the High Court is pleased to hereby invest following Judicial Officers with the powers under Section 260 of the said code :—

| *Sr. No.* | *Name of Judicial Officers* |
| --- | --- |
| (1) | (2) |
| 1 | Shri Santosh Laxman Vaidya<br>Civil Judge, Junior Division<br>and Judicial Magistrate, First Class,<br>Sindkheda, District Dhule. |
| 2 | Smt. Shabnam Yunus Shaikh<br>8th Joint Civil Judge, Junior Division<br>and Judicial Magistrate, First Class,<br>District Ahmednagar. |
| 3 | Shri Satish Madhukar Aher<br>5th Joint Civil Judge, Junior Division<br>and Judicial Magistrate, First Class,<br>District Dhule. |
| 4 | Shri Vijay Bhimrao Shitole<br>Joint Civil Judge, Junior Division<br>and Judicial Magistrate, First Class,<br>Shirpur, District Dhule. |

Bombay,
dated 17th February 2021.

S. G. DIGE,
Registrar General.

## नागरी नेमणुका

**विभाग प्रमुख आणि इतर सर्व संबंधित अधिकारी यांना कळविण्यात येते की, राजपत्रित अधिकाऱ्यांच्या रजा, बदल्या, नेमणुका, शक्ती आणि त्यांच्या इतर वैयक्तिक बाबी यासंबंधीचे आदेश शासनाकडून राजपत्राच्या या भागात अधिसूचनांच्या स्वरूपात प्रकाशित केले जातात ; त्यामुळे वरील बाबीसंबंधी सर्व संदर्भ निकालात निघाले आहेत असे समजण्यात यावे. अशा अधिसूचनांमुळे त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्यांची कार्यमुक्ती व तत्सम बाबी यासंबंधी आनुषंगिक आदेश काढणे आवश्यक असल्यास राजपत्र मिळाल्यानंतर त्यांनीच ते काढले पाहिजेत. कारण शासनाकडून इतर कोणतेही आदेश काढले जाणार नाहीत.**

## महसूल व वन विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ फेब्रुवारी २०२१.

### अधिसूचना

क्रमांक आयएफएस-१४२१/प्र.क्र. २०/फ-७अ.— श्री. अमित शालिग्राम कळसकर, (भावसे-२००१), मुख्य वन संरक्षक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य, प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नागपूर हे दिनांक ३१ जानेवारी २०२१ (मध्यान्होत्तर) रोजी शासनाच्या सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नितीन सावंत,**
कक्ष अधिकारी.

---

## REVENUE AND FOREST DEPARTMEMT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 15th February 2021.

### *NOTIFICATION*

No. IFS-1421/C.R. 20/F-7A.—Shri Amit Shaligram Kalaskar (IFS 2001), Chief Conservator of Forests and Member Secretary, Maharashtra State Zoo Authority, Nagpur has superannuated from the Government Service on 31st January 2021 (A.N.).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NITIN SAWANT,
Section Officer.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.